International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.9 No.5 May – June 2022

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकार विषयक विचार

**डॉ. ज्ञानराजा चिघळीकर**
सहा. प्राध्यापक अर्थशास्त्र विभाग, कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज
***Corresponding Author-*** ***डॉ. ज्ञानराजा चिघळीकर***
*Email-* dgceconomist@gmail.com

**प्रस्तावना**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक जागतिक अर्थशास्त्रज्ञ आहेत. त्यांनी आपले संशोधन, पुस्तके, भाषणे, शोधनिबंध, लेख इत्यादी माध्यमातून वेळोवेळी आपले आर्थिक विचार मांडलेले आहेत. विशेषतः सार्वजनिक आयव्यय, रुपयाचा प्रश्न, जातीव्यवस्थेचे अर्थशात्र, शेती, पाणी, वीज, रोजगार, वेतन व सहकार या विषयावर आपले विचार व्यक्त केलेले आहेत. सदर शोधनिबंधाच्या माध्यमातून आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'सहकार' विषयक दृष्टीकोनाची चर्चा करणार आहोत.

**उद्देश :**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सहकार विषयक विचारांचा अभ्यास करणे.

**गृहीतक :**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सहकार विषयक दृष्टीकोन सर्वसमावेशक स्वरूपाचा असून त्यात शेतकरी, बहिष्कृत समाज, आदिवासी अशा समाजातील शेवटच्या घटकांचा विचार करण्यात आलेला आहे.

**संशोधन पद्धती :** 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सहकार विषयक विचार' शोधनिबंध हा पूर्णपणे माहितीच्या दुय्यम साधनसामग्री वर आधारित आहे. विशेषतः संदर्भग्रंथ, नियतकालिके आणि वर्तमानपत्रात प्रकाशित झालेल्या लेखांचा आधार घेतला गेला आहे. विश्लेषण पद्धतीचा अवलंब करून निष्कर्ष काढण्यात आलेले आहे.

**संशोधनाचे महत्व :**
आज देशातील ८५ टक्के पेक्षा जास्त शेतकरी अल्पभूधारक आहेत. तसेच शेतजमिनीचे विभाजन अगदी लहान लहान तुकड्यात झालालेले आहे. पूर्वाश्रमीचा बहिष्कृत समाजाचे सहकार क्षेत्रातील प्रतिनिधित्व नगण्य स्वरूपाचे आहे. त्यामुळे त्यांच्या उन्नतीसाठी सहकार क्षेत्र महत्वाचे क्षेत्र ठरणार आहे.

**सहकाराची सुरुवात :** सहकार ही एक व्यापक संकल्पना असून निसर्गतःच माणसामध्ये एकमेकांना सहकार्य करण्याची प्रवृत्ती आहे. आधुनिक सहकाराची सुरुवात सन १८४४ मध्ये इंग्लंड मधील 'रॉश्डेल' येथे झाल्याचा इतिहास साक्षीला आहे. २८ विणकरांनी एकत्र येवून 'रॉश्डेल पायोनियर्स इक्विटेबल सोसायटी' या नावाने सहकारी ग्राहक भांडाराची स्थापन केली आणि तीच जगातील पहिली सहकारी संस्था ठरली. भारतामध्ये सहकाराची सुरुवात ब्रिटीश कालखंडात झाली. शेतकऱ्यांना कर्ज घेण्यासाठी सावकाराच्या दारात जावे लागत असे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या शोषणात वाढ झाली होती. यावर उपाय सुचविण्यासाठी 'फ्रेडरिक निकोल्सन' यांची नियुक्ती करण्यात आली. त्यांनी भारतातील शेतकऱ्यांना सहकारी तत्वावर कर्ज पुरवठा करणारी व्यवस्था असली पाहिजे अशी शिफारस केली. त्यानुसार 'सहकारी पतसंस्था अधिनियम १९०४' पारीत करण्यात आला,त्यानंतरच्या काळातच भारतामध्ये खऱ्या अर्थाने सहकारी चळवळीचा उदय झाला.

**अल्पभूधारक शेतकऱ्यांना विनाशापासून वाचिवण्यासाठी सहकारी शेती :**
भारतातीय शेतीमध्ये अप्लभुधारक शेतकऱ्यांचे प्रमाण ८५ टक्के पेक्षा जास्त आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या सहकार विषयक विचारामध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हिताचा विचार केलेला आहे.

**अल्पभूधारक मदत विधेयक :**

ऑक्टोबर १९२७ मध्ये एफ.जी.एच. अँडरसन यांनी मुंबई कायदे मंडळात 'अल्पभूधारक मदत विधेयक' (Small Holders Relief Bill) मांडले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी या बिलाला कडाडून विरोध केला. कारण अँडरसन यांच्या सदर विधेयकानुसार एका विशिष्ट आकाराच्या धारणक्षेत्रापेक्षा कमी धारणक्षेत्र कसणाऱ्या शेतकऱ्यास शिक्षेची तरतूद करण्यात आलेली होती. बाबासाहेबांची भूमिका अशी होती की, एकदा धारणक्षेत्र एका विशिष्ट आकाराचे असले पाहिजे अशी कायदेशीर तरतूद झाली तर छोट्या शेतकऱ्यांना आपल्या शेतजमिनी मोठ्या शेतकऱ्यांना विकल्याशीवाय पर्याय राहणार नाही. परिणामी छोटे शेतकरी भूमिहीन शेतमजूर होतील आणि देशोधडीला लागतील. म्हणून अशा विखुरलेल्या व लहान धारणक्षेत्राची समस्या सोडविण्यासाठी बाबासाहेबांनी सहकारी शेतीचा पर्याय दिला. यासंदर्भात बाबासाहेब म्हणतात की, "एका विशिष्ट आकाराची सहकारी शेते अस्तित्वात आणल्यास आपल्याला (श्री. अँडरसन यांच्या) प्रस्तुत विधेयकात अभिप्रेत असलेली उद्दिष्टे साध्य करता येतील. मुख्य म्हणजे आपल्याला छोट्या शेतकऱ्यांना त्यांच्या विनाशापासून वाचविता येईल. सहकारी शेतीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनीवरील मालकीहक्क अबाधित राहील."१

**बहिष्कृत वर्गाच्या उन्नतीसाठी सहकारी संस्थाची गरज :**

बहिष्कृत वर्गाची उन्नती करण्यासाठी सहकाराची कास धरावी लागेल अशी भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वेगवगळया ठिकाणी घेतलेल्या परिषदांमधून मांडलेली आहे.

**कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली महाड या ठिकाणी दिनांक १९ व २० मार्च १९२७ रोजी कुलाबा जिल्हा बहिष्कृत परिषद भरली होती. सदर परिषदेत मांडण्यात आलेल्या ठरावातील भूमिकेतून बाबासाहेब आंबेडकर यांचा सहकार विषयक दृष्टीकोन लक्षात येतो.

१) अस्पृश्य लोकांनी महारकी वगैरे सारखे हलके धंदे करण्याचे सोडून शेती वगैरेसारखे स्वतंत्र धंदे करण्याची पद्धत जोराने अमलात आणावी. शेतीस जरूर असलेल्या 'सहकारी पतपेढ्या' काढण्यात याव्यात.

२) दुष्काळ, अतिवृष्टीस तोंड देण्यासाठी व त्याचप्रमाणे सावकाराचे मगरमिठीतून सुटण्यासाठी 'सहकारी गल्ले' स्थापन करावीत, अशी या सभेची बहिष्कृत वर्गास आग्रहाची विनंती आहे.

**सोलापूर जिल्हा वतनदार महार परिषद :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षेतेखाली दिनांक २६ व २७ नोव्हेंबर १९२७ रोजी 'सोलापूर जिल्हा वतनदार महार परिषद' भरली होती. सदर परिषदेतील 'ठराव क्रमांक आठ' मध्ये बाबासाहेबांची सहकार विषयक भूमिका लक्षात येते. "जिल्ह्या-जिल्ह्यातील महार लोकांची आर्थिक गुलामगिरी नाहीशी करण्यासाठी व त्यांचा संसार अधिक सुखमय व्हावा म्हणून प्रत्येक जिल्हा वतनदार महासंघाने सहकारी मंडळं स्थापन करण्याची, सूत कातणे व कापड विणणे या कामांचा प्रसार करण्यासाठी व सहकारी शेतीवर्ग वसाहती स्थापन करण्याची शक्य तितक्या लवकर व्यवस्था करावी."

**बेळगाव जिल्हा बहिष्कृत वर्ग सामाजिक परिषद**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षेतेखाली दिनांक २३ मार्च १९२९ रोजी 'बेळगाव जिल्हा बहिष्कृत वर्ग सामाजिक परिषद' भरली होती. सदर परिषदेतील 'ठराव क्रमांक सहा' मध्ये बाबासाहेबांची सहकार विषयक भूमिका लक्षात येते. "चांभाराच्या धंद्याची स्थिती अत्यंत हलाखीची झाली असल्यामुळे त्यांचे धंदे शिक्षणाचे वर्ग काढावे व त्या समाजातील लोकांनी सहकारीतेच्या तत्वावर चालविलेल्या संस्थांना सरकारांनी सढळ हाताने मदत करावी आणि त्यांच्यातील लायक विद्यार्थ्यांस सरकारी खर्चाने त्यांच्या धंद्यांचे शिक्षण घेण्याकरिता परदेशी पाठवावे, असे या परिषदेचे मत आहे."

**अस्पृश्य व आदिवासींना सहकार संस्थांचे प्रतिनिधित्व**

शासनाने अस्पृश्यांच्या व आदिवासी जमातींच्या शैक्षणिक , आर्थिक व सामाजिक स्थितीची चौकशी करून ती सुधारण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरिता शासनाने नियुक्त केलेल्या स्टार्ट समितीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आले होते. या

समितीने मार्च, १९३० मध्ये शासनास सादर केलेल्या अहवालाद्वारे अस्पृश्य व आदिवासींना ग्रामीण क्षेत्रातील सहकारी संस्थांवर प्रतिनिधित्व देण्यात यावे, अशी शिफारस करण्यात आलेली होती.

**स्वतंत्र मजूर पक्षाचा जाहीरनामा व सहकार**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिनांक १५ ऑगस्ट १९३६ रोजी स्थापन केलेल्या स्वतंत्र मजूर पक्षाच्या जाहीरनाम्यात सुद्धा सहकारी संस्थांचा समावेश केलेला आहे. तो असा शेतीची प्रगती होऊन तो धंदा फलद्रूप व्हावा म्हणून लँड मॉर्गेज बँका, उत्पादक शेतकरी वर्गाच्या सहकारी पतपेढ्या आणि खरेदी विक्री करणारी मंडळे (Marketing Societies) यांची स्थापना करण्याचा या पक्षाचा कार्यक्रम आहे.

**सहकार विषयक संविधानिक तरतुदी :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष होते. त्यामुळे संविधान निर्मितीमध्ये निश्चितच त्यांचा सिंहाचा वाटा राहिलेला आहे. भारतीय संविधानामध्ये सहकारासंबंधीत कांही प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष स्वरूपाच्या तरतुदी करण्यात आलेल्या आहेत.

१) मुलभूत अधिकार अनु. १९ (१) (सी) सहकारी संस्था स्थापन करणे या बाबीचा समावेश मुलभूत अधिकारात करण्यात आलेला आहे.

२) राज्य धोरणाच्या मार्गदर्शक/निदेशक तत्व (अनु.४३ बी) मध्ये सहकारी संस्थांची ऐच्छिक स्थापना, स्वायत्त कार्यपद्धती, लोकशाही नियंत्रण, व्यावसायिक व्यवस्थापन आदींचा समावेश आहे. तर (अनु.४३) नुसार राज्य सहकारी तत्वावर कुटिरोद्योगांचे संवर्धन करण्यासाठी प्रयत्नशील राहील, अशी तरतूद केली गेली आहे.

**निष्कर्ष :**

१) आधुनिक सहकाराची सुरुवात इंग्लंड मधील रॉश्डेल येथे १८४४ मध्ये झालेली असून भारतात १९०४ साल उजाडावे लागले.

२) अँडरसन यांच्या स्मॉल होल्डर्स रिलीफ बिलास विरोध करून डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनी अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या हितासाठी सहकार शेती कशी उपयुक्त आहे ही भूमिका मांडली. जी त्यांनी १९१८ मध्ये " स्मॉल होल्डिंग इन इंडिया अँड देअर रेमिडीज" मध्ये अगोदरच मांडलेली होती.

३) बहिष्कृत वर्गाच्या सामाजिक आर्थिक उन्नतीसाठी सहकारी संस्था महत्वाच्या आहेत. अस्पृश्य व आदिवशींना योग्य प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे अशी अत्यंत महत्वाची भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर घेतल्याचे दिसून येते.

४) स्वतंत्र मजूर पक्ष या आपल्या राजकीय पक्षाच्या जाहीरनाम्यामध्ये सहकारी संस्था स्थापन करण्याचा संकल्प करून सहकार क्षेत्र किती महत्वाचे आहे याची जाणीव करून दिल्याचे दिसते.

५) भारतीय संविधनामध्ये प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे सहकारी संस्थांच्या संदर्भातील तरतुदी करून सहकाराचे महत्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न झाल्याचे दिसते.

**सारांश :**

डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांनी वेगवगळया माध्यमातून समाजातील शेवटचा तसाच वंचित असणारा वर्ग म्हणजे अल्पभूधारक शेतकरी, बहिष्कृत वर्ग, आणि आदीवाशी यांच्या उन्नतीसाठी सहकर क्षेत्र महत्वाचे आहे हे दाखवून दिले. त्यामुळे आजही समाजातील अल्पभूधारक शेतकरी, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास जाती, महिला यांच्या उन्नतीसाठी सहकाराची गरज आहे. या वर्गाला सहकारी संस्थामध्ये योग्यप्रमाणात संधी मिळाली पाहिजे. सहकारी संस्थाना सरकारने अनुदान वाढवले पाहिजे. तरच हा वर्ग सामाजिक आर्थिक दृष्ट्या सुरक्षित राहील.

**संदर्भ :**

१) मुणगेकर भालचंद्र, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक विचार", डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, संपा. दया पवार, मुंबई, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९९९.

२) पाटील, सुखदेव, "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सहकारी चळवळ," प्रबुद्ध भारत, दिनांक १६ ते ३० एप्रिल २०२२, पृष्ठ क्र. १५.

३) पाटील, सुखदेव, “डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सहकारी चळवळ,” प्रबुद्ध भारत, दिनांक १ ते १५ मे २०२२, पृष्ठ क्र. १५.

४) शहा, रूपा आणि दामाजी बी. एच., सहकार तत्वे व चळवळ, कोल्हापूर, फडके प्रकाशन,२०१२